www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-218 • Saturday, 13 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

**अनमोल विचार**

"कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका."

## लक्षवेधी

### कर्नाटकमधील काँग्रेस नेते २२ जानेवारीला करणार रामाची पुजा CM सिद्धरामय्या यांनी दिली माहिती

**नवी दिल्ली :** कर्नाटकातील काँग्रेस नेते आणि कार्यकर्ते येत्या २२ जानेवारीला देशभरातील राम मंदिरांमध्ये विशेष पूजा करतील अशी माहिती कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिली आहे.ते म्हणाले की २२ जानेवारीनंतर जेव्हा वेळ मिळेल तेव्हा आपणही अयोध्येत रामाच्या दर्शनाला जाणार आहोत.मला राम मंदिराच्या उद्घाटनाचे (२२ जानेवारी) निमंत्रण मिळालेले नाही. श्रीरामाला वंदन करण्यासाठी आम्ही भाजपच्या मागे धावत नाही आहोत.

### श्रीराममंदिराच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून ११ दिवसांच्या अनुष्ठानाला प्रारंभ!

**नवी दिल्ली :** अयोध्येतील श्रीराममंदिराच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना उद्देशून एक संदेश प्रसारित केला आहे. यात त्यांनी ते पुढील ११ दिवस अनुष्ठान करणार असल्याचे घोषित केले आहे. मोदी यांनी या संदेशात पुढे म्हटले आहे की, जीवनाचे काही क्षण ईश्वराच्या आशीर्वादामुळेच प्रत्यक्षात उतरत असतात. आज जगभरातील श्रीराम भक्तांसाठी असेच पवित्र वातावरण आहे. सर्वत्र प्रभु श्रीराम यांच्या भक्तीचे अद्भुत वातावरण आहे. चारही दिशांना श्रीरामनामाचा जप ऐकू येत आहे. प्रत्येकजण २२ जानेवारीची आतुरतेने वाट पहात आहे.

### 'मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यासाठी भावनिक मुद्द्यांचे राजकारण'

**नवी दिल्ली :** देशात सध्या भावनिक मुद्द्यांचा राजकीयदृष्ट्या 'दुरुपयोग' केला जात असून त्यातून देशातील जनतेचा 'विश्वासघात' करून खऱ्या मुद्द्यांपासून त्यांचे लक्ष विचलीत केले जात आहे असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त एक्सवरील हिंदीतील एका पोस्टमध्ये, राहुल गांधींनी स्वामी विवेकानंदांचे विचार स्मरणात ठेवून आचारण करण्याची गरज व्यक्त केली. स्वामी विवेकानंदांनी तरुणांची ऊर्जा समृद्ध देशाचा आधार मानली आणि पीडित आणि गरीबांची सेवा ही सर्वात मोठी तपश्चर्या मानली असे ते म्हणाले. आपल्या स्वप्नांच्या भारताची ओळख काय असेल याचा विचार तरुणांना करावा लागेल, जीवनाचा दर्जा की फक्त भावना? भडकाऊ घोषणा देणारे तरुण की नोकरदार तरुण? प्रेम की द्वेष? यातून तरूणांना योग्य ते निवडावे लागेल असे ते म्हणाले.

### पुंछमध्ये लष्कराच्या वाहनांवर दहशतवादी हल्ला; जवानांनी गोळीबाराला दिलं चोख प्रत्युत्तर

**नवी दिल्ली :** शुक्रवारी संध्याकाळी जम्मू-काश्मीर मधील पुंछ जिल्ह्यातील खनेतरमध्ये दहशतवाद्यांनीलष्कराच्या वाहनावर गोळीबार केला. ही कार लष्कराच्या कमांडिंग ऑफिसरची होती. या घटनेनंतर लष्कराने शोधमोहीम सुरू केली आहे. सध्या त्याची संपूर्ण माहिती मिळण्याची प्रतीक्षा आहे. अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यातही लष्कराच्या वाहनावर दहशतवाद्यांनी हल्ला केला होता, ज्यामध्ये लष्कराचे चार जवान शहीद झाले होते तर तीन जण गंभीर जखमी झाले होते. लष्कराच्या वाहनावर हल्ला करण्यासाठी दहशतवादी जंगलात लपून बसले होते. या घटनेनंतर लष्कराने संपूर्ण परिसराला वेढा घातला आणि मंडी ते पूंछ या मार्गावरील वाहनांची ये-जा थांबवली. लष्कराच्या जवानाने दहशतवाद्यांच्या शोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू केली. राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांतील सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये दहशतवादी अशा कारवाया करत असतात.

### राम मंदिर लोकार्पण सोहळ्याला अडवाणींसह 'हा' नेता देखील होणार कार्यक्रमात सहभागी

**नवी दिल्ली :** राम मंदिराचा लोकार्पण सोहळा येत्या 22 जानेवारी 2024 रोजी पार पडणार आहे.अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमात आता भाजपचे दिग्गज नेते लालकृष्ण अडवाणी आणि डॉ. मुरली मनोहर जोशी हे सहभागी होणार असल्याचे समोर येत आहे. या दोन्ही दिग्गज नेत्यांना 22 जानेवारीला होणाऱ्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी यापूर्वीच निमंत्रण पत्रे पाठवण्यात आली होती. मात्र विश्व हिंदू परिषदेच्या प्रमुख नेत्यांनी त्यांची पुन्हा एकदा भेट घेत कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची विनंती केली आहे. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी कार्यक्रमात सहभागी होण्यास संमती वर्तविली आहे. राममंदिर आंदोलनात सर्वात मोठी भूमिका बजावणारे लालकृष्ण अडवाणी आणि डॉ. मुरली मनोहर जोशी हे दोन प्रमुख नेते अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहणार नसल्याचा गैरसमज काही नेत्यांच्या विधानांमुळे निर्माण झाला होता.

### आम्ही कधीही राम मंदिरात जाऊ शकतो; मल्लिकार्जुन खरगेंची भाजपवर जोरदार टीका

**नवी दिल्ली :** श्रीराम मंदिराचे उद्घाटन आणि रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात न जाण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. यावरुन भाजप नेते सातत्याने काँग्रेसवर टीका करत आहेत. मल्लिकार्जुन खरगे आणि सोनिया गांधी यांनी कार्यक्रमाचे निमंत्रण नाकारल्याने त्यांचे खरे चेहरे देशासमोर उघड झाल्याचे भाजपचे म्हणणे आहे. दरम्यान, या वादावर आज खरगे यांनी प्रतिक्रिया दिली. खरगे म्हणाले की, मला मिळालेले निमंत्रण वैयक्तिक आहे, याबद्दल मी नंतर कधी बोलेन. रामावर विश्वास असलेले लोक आज, उद्या किंवा परवा जाऊ शकतात.

### थंडी-पावसाच्या खेळानंतर वाढणार तापमान ! देशातील वातावरणात पुन्हा बदल होण्याची शक्यता

**नवी दिल्ली :** देशासह महाराष्ट्रात काही दिवसांपासून थंडी आणि पावसाचा खेळ सुरू आहे. यामुळे वातावरणात अनेक बदल पाहायला मिळत आहेत. हिवाळ्यात पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.आता पुढील काही दिवस तापमानात वाढ होणार असल्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, राज्यासह देशातील नागरिकांना अवकाळी पाऊस आणि थंडीपासून दिलासा मिळणार आहे. पुढील 6 ते 7 दिवस तापमानात किंचित वाढ पाहायला मिळणार असून शनिवारपासून दिल्लीसह उत्तर प्रदेशमध्ये तापमान 20 अंशांवर जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

# देशातील सर्वात मोठ्या सागरी सेतूचं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन

# नवी मुंबई आता मुंबईपासून अवघ्या २० मिनिटांच्या अंतरावर



**पुढील १०० वर्ष हा पूल कायम राहणार-**

अटल सेतूच्या बांधकामासाठी १ लाख ७७ हजार ९०३ मेट्रिक टन स्टील आणि ५ लाख ४ हजार २५३ मेट्रीक टन सिमेंटचा वापर करण्यात आला आहे. या पुलासाठी जवळपास २१ हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे. या पूलावरून दिवसाला ७० हजार वाहने प्रवास करतील अशी अपेक्षा आहे. तसेच पुढील १०० वर्ष हा पूल कायम राहणार आहे. पावसाळ्याच्या दिवसात वेगवान वारे आणि वादळाचा सामना करण्यासाठी विशेष पद्धतीने लायटिंग पोल डिझाईन करण्यात आले आहे. विद्युत संकटकाळात कुठल्याही संभाव्य नुकसानीपासून वाचण्यासाठी लायटिंग प्रोटेक्शन सिस्टिम लावण्यात आली आहे. अटल सेतू हा मुख्यत: मुंबई – पुणे एक्सप्रेस वेला जोडण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहे. ज्यामुळे राज्यातील दोन प्रमुख शहरांना जोडण्याचे काम करेल. ज्यातून दळववळण करणे सोपे होईल. समुद्र तळापासून १५ मीटर उंचीवर पूलाचे बांधकाम करणे हे सर्वात मोठे आव्हानात्मक काम होते.

**■मुंबई। यश सावंत,**

मुंबईकरांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आणि बहुप्रतिक्षित असणाऱ्या अटल सेतूचं अर्थात शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतूचं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन झालं. मुंबई महानगराचा कायापालट करणारा हा प्रकल्प असल्याचं बोललं जात आहे. मुंबईतून नवी मुंबईत जाण्यासाठी हा मार्ग मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरणार असून अवघ्या २० ते २२ मिनिटांमध्ये हे अंतर पार करता येणार आहे. नरेंद्र मोदींनी अटल सेतूबाबत योग्य ती माहिती देखील संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली. यावेळी राज्याचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार उपस्थित होते. डिसेंबर २०१६ मध्ये नरेंद्र मोदींनीच या पुलाची पायाभरणी केली होती.

अटल सेतू हा १६.५ किमी समुद्रावर तर ५.५ किमी जमिनीवर बनलेला पूल आहे. हा देशातील सर्वात लांब सागरी सेतू आहे. हा पूल मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ याला जोडण्याचे काम करेल. मुंबईहून पुणे, गोवा आणि दक्षिण भारतातील प्रवासासाठी लागणारा वेळ या अटल सेतूमुळे कमी होणार आहे. अटल सेतूमुळे मुंबई ते नवी मुंबई यांच्यातील अंतर २० मिनिटांत कापता येणार आहे.

## शिंदे, फडणवीस, मुंडे, शाह, राणे अन्... घराणेशाहीवरुन डिवचल्याने ठाकरेंनी यादीच काढली

**■मुंबई । दिगंबर जाधव,**



शिवसेनेतील उद्धव ठाकरे गट आणि एकनाथ शिंदे गटामध्ये मागील 16 महिन्यांपासून सुरु असलेल्या वादावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी बुधवारी पडदा टाकत 'खरी शिवसेना' एकनाथ शिंदेंची असल्याचं म्हटलं. या निकालानंतर रात्री उशीरा पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी एकाधिकारशाही आणि घराणेशाही मोडीत निघाल्याचं आजच्या निकालावरून दिसतंय, अशी प्रतिक्रिया नोंदवली. या प्रतिक्रियेवरुन ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट मुख्यमंत्र्यांचे खासदार पुत्र श्रीकांत शिंदेंचा उल्लेख करत घराणेशाहीवरुन शिंदेंनाच लक्ष्य केलं. आता यापुढे जात ठाकरे गटाने भारतीय जनता पार्टीमधील अनेक कुटुंबांचा थेट उल्लेख करत शिंदे यालाही घराणेशाही म्हणणार का असा सवाल उपस्थित केला आहे. नार्वेकर यांनी शिंदे गटाच्या बाजूने निकाल दिल्यानंतर मुख्यमंत्री शिंदेंनी, लोकशाहीत बहुमताला महत्त्व असतं. बहुमत आमच्याकडे आहे.

## मुंबई महानगरपालिकेच्या उद्यानांमध्ये पुन्हा संगीत मैफली



**■मुंबई। विशाल कारंडे,**

संगीत क्षेत्रातील नवोदित कलाकारांच्या कलेला व्यासपीठ उपलब्ध व्हावे, भारतीय शास्त्रीय संगिताची अधिकाधिक नागरिकांमध्ये गोडी निर्माण व्हावी तसेच उद्यानांत सकाळी फेरफटका मारण्यासाठी आलेल्या नागरिकांना सूरमयी सकाळचा अनुभव मिळावा यासाठी पालिकेच्या उद्यान विभागाने मुंबई शहर व उपनगरातील एकूण दहा उद्यानांमध्ये १४ जानेवारी रोजी मुंबई 'ग्रीन रागा' या संगीत कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात संगीत क्षेत्रातील सुमारे ५० कलाकारांचा समावेश असून सकाळी ७ ते ९ या कालावधीत विविध उद्यानांमध्ये संगीत मैफिल रंगणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागातर्फे नागरिकांच्या मनोरंजनासाठी विविध उपक्रम राबविले जातात. यापूर्वी नागरिकांकरिता नाविन्यपूर्ण संकल्पना, वाचनालय, लहान मुलांसाठी खेळाची साधनसामग्री, प्रभातफेरी, ग्रीन जिम, मियावाकी वृक्षारोपण आदी उपक्रम राबविण्यात आले आहेत. तसेच, उद्यान विभागाने २०१९ साली एनसीपीए, बनयान ट्री आणि ट्रापा या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने संगीत कार्यक्रमाची सुरुवात केली.

## महाराष्ट्र शासनाचा निषेध केल्याप्रकरणी शिवसेना ठाकरे गटाच्या १९ पदाधिकाऱ्यांवर गुन्हा



**■उल्हासनगर। भावना जैन,**

शिवसेना पक्षाबाबत विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाचा निषेध शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकार्यांनी गुरवारी छत्रपती शिवाजी महाराज चौकात केला. या निषेधाची दखल मध्यवर्ती पोलिसांनी घेऊन निषेध करणाऱ्या १९ जणां विरोधात गुन्हे दाखल केले असून वैयक्तिक जमिनीवर त्यांची सुटका करण्यात आली. उल्हासनगर कॅम्प नं-३ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी एकत्र येत विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी शिवसेना पक्षाबाबत दिलेल्या निर्णयाचा निषेध केला.

दुसरीकडे नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाचे शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकार्यांनी त्याच रात्री खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संपर्क कार्यालया समोर फटाक्यांची आतिषबाजी करून पेढे वाटले. तर गुरवारी शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकार्यांनी कॅम्प नं-३ येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेना पक्षाबाबत नाराजी व्यक्त करून निर्णयाचा निषेध केला.

## महाराष्ट्रात ८ लाख ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे सुरू; एकनाथ शिंदेंनी दिली माहिती



**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

देशातील सर्वात मोठा सागरी मार्ग सुरू झाला आहे. कोरोना असताना देखील काम केले योग्य वेळेत काम पूर्ण झाले, आता २० मिनिटात रायगड जिल्ह्यात पोहचू शकतो. त्यामुळेइंधन आणि वेळ वाचेल असे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबईत आयोजित कार्यक्रमात विविध विकासप्रकल्पांचे लोकार्पण करण्यात आले त्यावेळी एकनाथ शिंदे बोलत होते. महाराष्ट्रात सर्वाधिक पायाभूत सुविधांचे प्रकल्प सुरु असून आपल्याकडून जे प्रस्ताव केंद्रात जातात, ते मंजूर होतात. महाराष्ट्राची विश्वासार्हता वाढत असून गुंतवणुकदारांचा देखील गुंतवणुकीसाठी प्रतिसाद वाढला आहे. राज्यात सुमारे ८ लाख ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील अडथळेही दूर झाले असून या मार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असल्याची माहिती एकनाथ शिंदेंनी दिली.

## राज्यातील सर्व शाळांमध्ये सत्यशोधक चित्रपट दाखवला पाहिजे : शरद पवार



**■पुणे। अभिजित येरल्लू,**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जीवनावर आधारित 'सत्यशोधक' चित्रपटाचा विशेष प्रयोग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासाठी पुण्यातील कोथरूड येथील सिटी प्राईड आयोजित करण्यात आला होता. तो चित्रपट पाहिल्यानंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत बोलताना शरद पवार म्हणाले की, सत्यशोधक हा एक उत्तम चित्रपट आहे.

त्यामध्ये फुलेच्या आयुष्यातील प्रसंग वास्तव रुपात मांडण्यात आलेले आहेत. कुठल्याही प्रकारची अतिशयोक्ती नाही. अतिशय प्रभावी पद्धतीने साकारण्यात आलेला आहे. पण सध्याची एकूणच सामाजिक स्थिती पाहिल्यावर आजच्या काळात आपण ५० ते ६० वर्ष मागे जातोय की, काय अशी सामाजिक स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत महात्मा फुलेनी मांडलेला सत्यशोधक विचार समाजापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. त्या पार्श्वभूमीवर सत्यशोधक हा चित्रपट महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये दाखवण्यात आला पाहिजे.

## मोदींच्या दौऱ्यावर जरांगेंचा निशाणा; सांगितली आंदोलनाची दिशा, पुण्यात कोट्यवधी मराठे जमणार

**■मुंबई । विशाल पाटील,**



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज महाराष्ट्र दौरा केला असून नाशिक आणि मुंबईतून विविध विकामकामांचे उद्घाटन पंतप्रधानांच्याहस्ते झाले. नाशिकमधील काळाराम मंदिरात त्यांनी स्वच्छता करुन सेवा दिली. यावेळी, संबोधित करताना मोदींनी युवा दिनाच्या निमित्ताने आणि माँ साहेब जिजाऊंच्या जयंतीनिमित्त अभिवादन केले. देश प्रगती करत असून देशाच्या प्रगतीचा सर्वात मोठा वाटा तरुणाईचा असल्याचं म्हटलं. तर, मुंबईतील अटल सेतूच्या उद्घटनानंतर बोलतान, गेल्या १० वर्षात भारत बदलल्याचं सांगितलं. दरम्यान, मोदींनी आपल्या भाषणात कुठेही मराठा आरक्षणाच्या मुद्द्याला स्पर्श देखील केला नाही. त्यामुळे, यासंदर्भात उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली. मनोज जरांगे पाटील यांनी मोदींच्या आजच्या दौऱ्यावर भाष्य करताना, आता मराठा कोणाच्या पाया पडणार नाहीत, आम्ही लढून आरक्षण मिळवू, असे म्हटले. "मोदींना सर्वसामान्यांची आता गरज राहिली नाही.

मोदींच्या शिर्डी दौऱ्यावेळीही मी सांगितलं होतं की, तुम्ही राज्य सरकारला निर्देश द्या, कारण राज्य सरकारच्या अधिकारात निर्णय आहे, पण त्यांनी नाही केलं. त्यामुळे, आता त्यांच्या पाया पडण्याची गरज नाही, मराठाच बलवान आहे.

## मीरारोड पोलिसांनी मिळवून दिले 30 मोबाईल

**■मीरारोड। सचिन कदम,**

मीरारोड पोलीस ठाणे हद्दीत विविध नागरिकांचे मोबाईल गहाळ झाल्याच्या तक्रारीं प्रकरणी पोलिसांनी केलेल्या तपासा नंतर ३० मोबाईल हस्तगत करून संबंधित नागरिकांना परत करण्यात आले आहेत.

मीरारोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रवास करताना तसेच अन्यत्र मोबाईल गहाळ होण्याच्या घटना घडतात . मोबाईल गहाळ झाल्या बद्दल नागरिक पोलिसांच्या संकेतस्थळावर ऑनलाईन तक्रार करतात. आलेल्या तक्रारी नुसार मीरा भाईंदर परिमंडळ१ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे व सहायक आयुक्त महेश तरडे यांच्या मार्गदर्शनाखाली मीरारोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सरोदे, गुन्हे प्रकटीकरणचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पाटील , सहायक पोलिस निरीक्षक संतोष सांगवीकर व रामकृष्ण बोडके , उपनिरीक्षक किरण वंजारी सह प्रशांत महाले, प्रफुल्ल महाकुलकर, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, परेश पाटील, तानाजी कौटे, शंकर शेळके, अथर्व देवरे यांच्या पथकाने हरवलेल्या मोबाईलचा तपास चालवला होता. उपायुक्त कार्यालयातिल जयप्रकाश जाधव यांनी तांत्रिक मदत केली .



हरवलेल्या मोबाईल फोनबाबत दूरसंचार विभागाचे नागरिक केंद्र यांच्या माध्यमातुन तसेच हरविलेल्या मोबाईलच्या आय. एम. ई. आय क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करुन मोबाईल फोनचा शोध घेण्यात आला . सन २०२३ मध्ये मीरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास एकुण ३ लाख रुपयांचे ३० मोबाईल फोन

## पुर्नवसन होत नाही, तोपर्यंत जाणार नाही; श्रमजीवी संघटनेचा आक्रमक पवित्रा, जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन

**■ठाणे। नितीन देवळेकर,**



ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक जिल्ह्यातील २०१९ पासून ५०० जणांना वेठबिगार मुक्तीचे दाखल दिले. मात्र, त्यांचे अद्याप पुनर्वसन करण्यात आले नाही. त्याच्या निषेधार्थ व पुनर्वसन करण्याच्या प्रमुख मागणीसाठी श्रमजीवी संघटनेच्यावतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर शुक्रवारी आंदोलन पुकारले. यावेळी श्रमजीवी संघटनेने आक्रमक पवित्र घेत, पुर्नवसन होत नाही, तो पर्यंत जाणार नाही असा वीतरा घेतला आहे. तर, यावेळी आंदोलन कर्त्यांनी हातात व गळ्यात साखळी दंड घालून सरकारचा निषेध करीत असल्याचे दिसून आले. तसेच मुख्यमंत्र्यांच्या घरी जाऊन सर्व मुक्त वेठबिगार त्यांचे वेठबिगार मुक्तीचे दाखले परत करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली. ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक जिल्ह्यातील वेठ बिगारांचे शोध घेऊन त्यांना मुक्त करण्याची जबाबदारी कायद्याने शासनाची आहे. असे असताना, शासन विठबिगारांचा शोध घेऊन मुक्त करण्यात कमी पडत असल्याचे दिसून येत आहे. त्यात श्रमजीवी संघटनेच्या शोध मोहीमेतून नाशिक, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातून २५० मुक्त झालेल्या वेठबिगारांना केंद्र शासनाच्या निदेर्शानुसार त्यांना तातडीने मुक्ती नंतर तिन दिवसाच्या आत ३० हजार अर्थ सहाय्य मिळायला हवे होते.

## एनएच - ४८ वरून सव्वा नऊ कोटींचा गुटखा जप्त, सात जणांना अटक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत अवैधपणे गुटखा विक्री करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे शाखेची धडक कारवाई सुरु असून, गुन्हे शाखेने राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवरून सव्वा नऊ कोटींचा गुटखा जप्त केला आहे.

याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे.

राज्यात प्रतिबंधीत असलेल्या गुटख्याची अवैधरित्या विक्री केली जात असल्याची माहिती कक्ष नऊचे प्रभारी पोलीस निरिक्षक दया नायक यांना मिळताच, त्यांच्या नेतृत्वात कक्ष नऊच्या पथकाने सोमवारी सापळा रचला. डी. एन. नगर परिसरातून गुटख्याची अवैध वाहतूक करत असलेला एक ट्रक ताब्यात घेतला. या कारवाईत गुन्हे शाखेने एकूण १ कोटी ६ लाखांचा गुटखा जप्त केला. याच आरोपींच्या चौकशीतून मुंबईत गुटख्याचे आणखीन चार ट्रक येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार, दया नायक यांच्या नेतृत्त्वात तपास अधिकारी सचिन पुराणिक, दिपक पवार,उत्कर्ष वझे, महेंद्र पाटील आणि अंमलदार यांनी सापळा रचला. गुरुवारी पालघरच्या कासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर एकुण ४ मोठे ट्रक भरून प्रतिबंधीत गुटखा जप्त केला.

## 'कोणतीही नशा करू नका, ड्रग्जपासून लांब राहा, माता बहिणींना...'; पंतप्रधान नरेंद्र मोदींचा युवकांना मोलाचा सल्ला



**■नाशिक। प्रगती शर्मा,**

मेड इन इंडिया उत्पादनाचा उपयोग करा, मद्यपानापासून दूर राहा, ड्रग्जच्या आहारी जाऊ नका, आई बहिणींवरून अपशब्द वापरणे बंद करा, असा मोलाचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांना दिला. नाशिक येथे राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनाला नरेंद्र मोदी आले होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवकांना मार्गदर्शन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी भाषणात म्हणाले की, माज्या युवा सहकाऱ्यांनो, आपल्या देशातील ऋषी मुनींपासून सामान्य माणसांपर्यंत सर्वांनी युवाशक्तीला सर्वोपरी ठेवलं. श्री अरविंदो म्हणाले, जर भारताला आपलं लक्ष्य गाठायचं असेल तर भारताच्या युवकांना एक स्वतंत्र विचाराने पुढे जावं लागेल. दहा वर्षात तरुणाईला आकाश खुलं केलं - आमच्या सरकारला १० वर्ष होत आहे. या काळात आम्ही पूर्ण प्रयत्न केला की युवकांना खुलं आकाश मिळवं, त्यांच्यासमोरील प्रत्येक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांना रोजगार, शिक्षण, स्टार्टअप, स्किल असे सर्वकाही युवकांसाठी खुलं केलं.

२१ व्या शतकात आधुनिक शिक्षणासाठी नवं शिक्षण धोरण आणलं. युवकांसाठी आधुनिक स्किल इकोसिस्टिम सुरु होत आहे. द्वट विश्वकर्मा योजना, स्त्रे कौशल विकास योजना आणून तरुणांना जोडलं.

# अटल सेतूच्या शुभारंभाला रामाचा नारा, विकास प्रकल्पातून महायुतीची हिंदुत्वाची पेरणी

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या वेगवेगळ्या विकास प्रकल्पांच्या लोकार्पण सोहळ्याच्या माध्यमातून राज्यातील महायुती सरकारने आणि विशेषतः भाजपने हिंदुत्वाचा नारा बुलंद करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केल्याचे दिसून आले. शिवडी न्हावाशेवा अटल सेतूचे नवी मुंबईकडील टोक असलेल्या चिर्ले नाक्यावर भाजपने जागोजागी श्री रामाचा नारा देणारे होर्डिंग, बॅनर उभारून राम मंदिर उभारणीबद्दल पंतप्रधानांना शुभेच्छा देण्यासाठी विशेष आखणी केल्याचे दिसून आले.

सागरी सेतूसारख्या मोठ्या प्रकल्पाचे लोकार्पण होत असताना ठाणे, रायगड, नवी मुंबई पट्ट्यात पद्धतशीरपणे वातावरण निर्मिती करत हिंदुत्वाची पेरणी करण्याची रणनीति यानिमित्ताने आखण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून आले. पंतप्रधानांच्या स्वागतासाठी मुंबई, ठाणे आणि रायगड पट्ट्यातील शिवसेना भाजप महायुतीच्या नेत्यांनी जोरदार शक्ती प्रदर्शनाची तयारी केल्याचे दिसून आले.



**रामाचा नारा, मंदिराबद्दल अभिवादन**

शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूचे एक टोक असलेल्या उलवेलगतच्या चिर्ले भागात पंतप्रधानांच्या स्वागतासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. चिर्ले ते नवी मुंबई विमानतळ या साडेपाच किलोमीटर अंतराच्या मार्गावर पंतप्रधानांचा रोड शो केला गेला. हे करत असताना रस्त्याच्या दुतर्फा त्यांचे आगरी कोळी पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्याचे नियोजन करण्यात आले होते. दुपारी एक वाजल्यापासूनच उरण, पनवेल पट्ट्यातील आगरी-कोळी समाजातील महिला, पुरुष तसेच ढोल, ताशांची पथके याठिकाणी तैनात करण्यात आली होती. या रोड शो दरम्यान हिंदुत्वाची घोषणा अधिक ठसविण्यासाठी जागोजागी जय श्री रामाची घोषणा असलेले फलक, होर्डिंग उभारण्यात आले होते. या संपूर्ण कार्यक्रमाला येत्या २२ तारखेला होणाऱ्या राम मंदिर उद्घाटनाचा साज चढविण्याचा प्रयत्नही महायुतीकडून पद्धतशीरपणे करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी ठाणे, रायगड तसेच आसपासच्या भागातून सव्वालाख स्त्री पुरुषांची गर्दी जमविण्याचे नियोजन करण्यात आले होते. ठाणे, पनवेल, नवी मुंबई तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक, कर्मचारी यांना पंतप्रधानांच्या सभेपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती.

हे करत असताना भाजपचे पनवेल आणि उरणचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांच्याकडे पंतप्रधानांच्या स्वागताची विशेष जबाबदारी सोपविण्यात आली होती. हे स्वागत करताना हा कार्यक्रम केवळ विकास प्रकल्पांपुरता मर्यादित रहाणार नाही याची पुरेपूर खबरदारी महायुतीच्या नेत्यांनी घेतल्याचे पहायला मिळाले. अटल सेतूच्या पायथ्यापासून नवी मुंबई विमानतळाच्या मार्गापर्यंत जागोजागी जय श्रीरामाचा नारा देणारे फलक आणि पंतप्रधान यांची छबी असलेले बॅनर लावण्यात आले होते.

काही ठिकाणी विकासाच्या वाटेवर समर्थ भारताचे पुनरुत्थान असा संदेश देणारे फलकही उभारण्यात आले होते. अटल सेतूच्या दोन्ही बाजूस समुद्रात मोठ्या संख्येने बोटी तैनात करण्यात आल्या होत्या. या बोटीतून दीडशे फूट उंचीचे जय श्रीराम गोंदविलेले फुगे सोडण्यात आले होते.

## दिघा गाव स्थानकाचे उद्घाटन खासदार राजन विचारे यांच्या हस्ते करण्याचा प्रयत्न

**■ठाणे।प्रतिनिधी,**

ठाणे आणि ऐरोली दोन स्थानकांच्या दरम्यान नव्याने तयार करण्यात आलेल्या दिघा गाव या रेल्वे स्थानकाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी च्या हस्ते आज सायंकाळी करण्यात येणार आहे. परंतु त्यापूर्वीच खासदार राजन विचारे यांनी स्थानकाच्या उद्घाटनाचा प्रयत्न केला. ठाकरे गट थेट स्थानकात शिरले. त्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

ठाणे ते ऐरोली दोन स्थानकादरम्यान दिघा गाव हे स्थानक तयार करण्यात आले आहे. हे स्थानक



खासदार राजन विचारे यांच्या मतदार संघात आहे शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्थानकाचे उद्घाटन केले जाणार आहे. स्थानिक खासदार असूनही स्थानकाच्या उद्घाटन निमंत्रण पत्रिकेत राजन विचारे यांचे नाव नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

गेल्या काही दिवसांपासून दिघा स्थानक सुरू व्हावे यासाठी अजून विचारे पाठपुरावा करत होते. शुक्रवारी दुपारी राजन विचारे यांनीच स्थानकाच्या उद्घाटनाचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. ढोलताशे घेऊन ठाकरे गट स्थानकात शिरले. यावेळी भाजपचे कार्यकर्ते स्थानकात मोदी यांचा कार्यक्रम पाहत होते. दोन्ही गट समोरासमोर आले आहेत.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचं नाव मिळणारच, पुत्र अतुल पाटील यांना विश्वास



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचं नाव देण्याचा प्रस्ताव अंतिम केला आहे. हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे विचाराधीन आहे. अनेकांच्या मनात याविषयी वेगवेगळ्या शंका असल्या, तरी दि. बा. पाटील यांच्या कुटुंबीयांच्या मनात याविषयी अजिबात शंका नसून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी नक्की देतील असा विश्वास दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. शिवडी- न्हावा शेवा 'अटल सेतू' ज्या ठिकाणी उभा आहे याठिकाणची नवी मुंबईकडील बाजूस असलेली जागा ही दि. बा. पाटील यांच्या कुटुंबीयांची होती. सिडकोच्या अधिग्रहणात ती जागा संपादित झाली असेही अतुल पाटील यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचं नाव आजच जाहीर करतील असा मला विश्वास आहे असेही अतुल पाटील यांनी सांगितले. तसेच काही दिवसात केंद्रीय मंत्री सिंधीया हे देखील नवी मुंबईच्या दौऱ्यावर आहेत.

## नरेंद्र मोदींच्या दौऱ्यामुळे कधी नव्हे ते शक्य झालं

### नवी मुंबई शहर आणि परिसरात वाहतूक कोंडी मुक्त प्रवास



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवी मुंबई दौऱ्यामुळे नवी मुंबईसह मुंबई महानगर पट्ट्यातील प्रवासी शुक्रवारी कोंडीमुक्त प्रवासाचा आनंद घेत आहेत. मोदी यांच्या दौऱ्यामुळे नवी मुंबई विमानतळ प्रकल्प तसेच आसपासच्या दगड खाणी बंद ठेवण्यात आल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून उरण तसेच आसपासच्या परिसरातील नागरिकांना मोकळ्या हवेचा आनंद घेता येत आहे. उलवेकरांनाही मागील तीन दिवसांपासून प्रदूषण मुक्तीचा अनुभव घेता येत आहे. पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर काल मध्यरात्रीपासूनच उरणच्या दिशेने जाणारी अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आल्याने नवी मुंबई, ठाणे-बेलापूर मार्ग, कल्याण शीळ रस्ता, शीळफाटा, तळोजा शीळ रस्ता तसेच मुंबई गोवा महामार्गावरही वाहतूक कोंडीचा लवलेशही दिसत नव्हता. यामुळे संपूर्ण मार्गावर गोंडी मुक्त प्रवासाचा आनंद प्रवाशांना घेणे शक्य झाले. पंतप्रधानांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर उरण मधील जेएनपीए बंदर आणि बंदराच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे येथील दररोज मालाची ने-आण करणारी ३० हजाराहून अधिक वाहने बंद आहेत. परिणामी दररोजच्या रहदारीच्या रस्त्यावर शुकशुकाट पसरला आहे. वाहतूक बंदीचे आदेश काढण्यात आल्याने जेएनपीए बंदरावर आधारित उद्योगातील मालाची ने आण करणारी कंटेनर वाहने बंद करण्यात आली आहेत. बंदरातील मालाची वाहतूक करून बंदरातून गोदमात आणि गोदमातून जहाजात माल नेणारी वाहनेही बंद आहेत. शीव-पनवेल महामार्गावर, पनवेल आणि आसपासचा परिसरार, शिळ फाटा या भागात अवजड वाहतूकीमुळे नागरिकांना दररोज वाहतुक कोंडीचा सामना करावा लागतो. पंतप्रधानाच्या सभेनिमित्ताने संपूर्ण अवजड वाहतूक आज बंद करण्यात आल्याने सकाळपासूनच प्रवाशांना कोंडी मुक्त प्रवासाचा अनुभव घेता आहेत.

## ठाण्यात खडी यंत्रात पडून मजुराचा मृत्यू

**■ठाणे।प्रतिनिधी,**

घोडबंदर येथील नागलाबंदर भागात खडी यंत्रामध्ये पडून भलबद्र यादव (४०) या मजुराचा मृत्यू झाला आहे. सुरक्षा साधने पुरविली नसल्याप्रकरणी खडी यंत्र मालकाविरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागलाबंदर भागात भलबद्र हे त्यांची पत्नी, तीन मुली आणि एका मुलासोबत राहत होते. ते परिसरात खडी यंत्र चालविण्याचे काम करतात. गुरुवारी सायंकाळी ते खडी यंत्रामध्ये खडीची पावडर करण्याचे काम करत होते. त्यावेळी तोल जावून ते या यंत्रात पडले. यंत्र सुरू असल्याने ते त्यात अडकले. घटनेची माहिती परिसरातील इतर मजुरांना मिळाली. त्यानंतर यंत्र बंद करण्यात आले. मजुरांनी त्यांना खडी यंत्रामधून बाहेर काढले. त्यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर तेथून त्यांना ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना तपासले असता, त्यांना मृत घोषित करण्यात आले. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा दौरा अन् ठाणेकरांची कोंडीतून सुटका



**■ठाणे।प्रतिनिधी,**

राज्यातील विविध महत्त्वकांक्षी प्रकल्पाच्या लोकार्पणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असल्यामुळे ठाणे , नवी मुंबई परिसरात अवजड वाहतुकीला प्रवेश बंद करण्यात आला आहे. यामुळे ठाणे, घोडबंदर तसेच परिसरातील रस्त्यांवर अवजड वाहतुकीचा भार कमी होऊन कोंडीमुक्त झाल्याचे चित्र दिसून आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवारी राज्यातील विविध महत्त्वकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण केले जाणार आहे. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी मुंबईत येत आहेत. अवजड वाहनांमुळे नवी मुंबईत कोंडी होऊ नये म्हणून शुक्रवारी ठाण्यात अवजड वाहनांना प्रवेश बंदी लागू केली आहे. गुजरात राज्य आणि भिवंडी येथून हजारो अवजड वाहने उरण जेएनपीटी येथे वाहतुक करत असतात. ही अवजड वाहने ठाण्यातील मुंब्रा बाह्यवळण, शिळफाटा मार्गे नवी मुंबईत जातात. तसेच नाशिक येथून सुटणाऱ्या अवजड वाहनांचा भारही या मार्गावर मोठा असतो. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे पाच या वेळेत वाहतुक करण्यास मुभा आहे. या कालावधीत ठाणे आणि नवी मुंबई परिसरातील रस्त्यांवर अवजड वाहनांचा भार वाढून कोंडी होते. परंतु शुक्रवारी मात्र शहरात उलट चित्र दिसून आले.



## उरण-खारकोपर मार्गावरील स्थानकांच्या नामकरणाच्या पार्श्वभूमीवर कडक बंदोबस्त

**■उरण। प्रतिनिधी,**

उदघाटनाच्या वेळी स्थानिक गावांची नावे स्थानकांना न दिल्याने आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या विरोधाच्या पार्श्वभूमीवर रांजणपाडा स्थानकात पोलिसांची प्रचंड बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. येथे रांजणपाडा ऐवजी स्थानिक धुतुम गावाचे स्थानकाला नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. उरण ते खारकोपर रेल्वे मार्गावरील स्थानकांना गावांची नावे देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. मात्र हा प्रस्ताव गुलदस्त्यात आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेला जाण्या-येण्यासाठी तब्बल १०० एनएमएमटी बस

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

अटल सागरी सेतूचे उदघाटन आणि त्या नंतर होणाऱ्या सभेसाठी नवी मुंबई महानगर पालिकेच्या परिवहन उपक्रमातील १०० बस सुविधा देण्यात आली आहे. शहरातील ठिकठिकाणाहून या बस निघणार आहेत. न्हावा शेवा ते शिवडी या सागरी सेतूचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज केले जाणार आहे. त्या नंतर मोदी यांची सभा असून या सभेला जाण्यासाठी नवी मुंबईतून लोकांना जाण्यासाठी एन एम एम टी ने १०० गाड्यांची सोय केली आहे. या गाड्यात इलेक्ट्रॉनिक आणि डिझेल गाड्यांचा समावेश असणार आहे. सदर गाड्या नवी मुंबईतील दिघा ऐरोली ते सीबीडी मधून ठिकठिकाणाहून निघणार आहे. यासाठी भाजप नेत्यांशी समन्वय ही साधण्यात आलेला आहे. अशी माहिती एनएमएमटीने दिली आहे.

## वसई विरार शहरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट, २०२३ मध्ये १९ बोगस डॉक्टरांवर कारवाई

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई विरार महापालिकेच्या आरोग्य विभागाने २०२३ मध्ये एकुण १९ बोगस डॉक्टरांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. यातील अनेक डॉक्टर्स हे वैद्यकीय प्रमाणपत्र नसताना, दुसऱ्याच्या नावावर तसेच मान्यता नसताना ॲलोपॅथी दवाखाना चालवत होते. वसई विरार शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे होत असून नवनवीन वसाहती तयार होत आहेत. या अनधिकृत बांधकामे असलेल्या परिसरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे. परराज्यातून मान्यता नसलेल्या वैद्यकीय महाविद्यालयांच्या पदव्या असलेले, कसलेही वैद्यकीय प्रमाणपत्र नसलेले ठकसेन डॉक्टर बनून धंद करत आहेत. यामुळे रुग्णांवर चुकीचे उपचार होऊन त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. मान्यता नसलेल्या विद्यापीठाची पदवी किंवा प्रमाणपत्र नसताना बेकायदेशीरपणे ते दवाखाना चालवत आहेत. यातील अनेक डॉक्टर्स हे प्रत्यक्षात डॉक्टर्स नसताना तोतयागिरी करून डॉक्टर बनून रुग्णांवर उपचार करत होते. मागील वर्षात पालिकेने अशा बोगस डॉक्टरांविरोधात मोठी कारवाई केली होती. वर्षभरात पालिकेने एकूण १९ बोगस डॉक्टरांवर कारवाई करून त्यांचे दुकान बंद केले होते. या सर्व बोगस डॉक्टरांविरोधात भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ४२० सह वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३, ३३ (ए) व औषधी द्रव्य व सौदर्य प्रसाधन १९४० चे कल १८ (सी) १८ ए, २७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आला आहे. बोगस डॉक्टरांविरोधातील कारवाई या वर्षात अधिक तीव्र करणार असल्याचे पालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती चौधरी यांनी सांगितले. नालासोपारा पूर्वेच्या रिचर्ड कंपाऊंड येथे मोहम्मद बद्रबोजा इनामूल हाका (३४) हा साई क्लिनिक चालवत होता. त्याच्याकडे मान्यता नसलेली नॅशनल पॅरॅमेडिकल काऊन्सिल ॲण्ड वोकेशनल बोर्ड कौशल्य विकास यांच्याकडील इलेक्ट्रोपॅथिची पदवी होती. तरी तो ॲलोपॅथिक डॉक्टर असल्याचे भासवून क्लिनिक चालवत होता. त्याच्या क्लिनिकमध्ये ॲलोपॅथिक औषधे, महागडी उपकरणे आढळून आली. सातिवलीच्या मौर्या नाका येथे दिलीपकुमार शर्मा (५५) हा साई श्रद्धा पॉलिक्लिनिक नावाचा दवाखाना चालवत होता. त्याच्याकडे कसलेही वैद्यकीय प्रमाणपत्र नव्हते. त्याच्याकडे ॲलोपॅथीची औषधे, उपकरणे आढळून आली. वसई पूर्वेच्या हवाई पाडा येथे संतोष झा (२७) याच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो दुसऱ्या बीएएमस डॉक्टरच्या नावाने खुशी क्लिनिक चालवत होता. त्याच्या तपासणीत वैद्यकीय प्रमाणपत्र आढळले नाही.

## वसई, भाईंदरमध्ये वाढता देहव्यापार

### २०२३ मध्ये ५२ गुन्हे, १०४ तरुणींची सुटका

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेच्या भाईंदर कक्षानेही २०२३ या वर्षात पिटा कायद्याअंतर्गत ३१ कारवाया केल्या आणि ६४ तरुणींची सुटका केली. त्यामध्ये ४ अल्पवयीन मुलींचा समावेश होता. या प्रकरणात ५४ दलालांना अटक करण्यात आली. त्यात २२ महिलांचा समावेश आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी दिली.

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई- विरारच्या म्हाडा येथे नुकताच सेक्स रॅकेट उघडकीस आल्यानंतर शहरातील वाढत्या वेश्याव्यवसायाचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे. वसई विरार तसेच मीरा रोड आणि भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणावर वेश्याव्यवसाय सुरू आहे. परराज्यातील तरुणींना फसवून या व्यवसायात आणले जात आहे. अशा प्रकरणी मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने २०२३ या वर्षात ५२ गुन्हे दाखल करून १०४ तरुणींची सुटका केली आहे. शहराच्या लोकसंख्येबरोबरच अनेक गुन्हेगारी कारवाया वाढत आहेत. परराज्यातील अल्पवयीन मुली तसेत तरुणींना फसवणून आणून देहव्यापार करवून घेतला जात आहे. वसई, नालासोपारा, विरार, आदी शहरांच्या विविध भागांत हा छुपा व्यवसाय राजरोस सुरू आहे. अशा वेश्याव्यवसायांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेकडून कारवाया सुरू असतात. नालासोपारा येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष चौधरी यांच्या पथकाने २०२३ या वर्षात पिटा (अनैतिक वाहतूक प्रतिबंधक कायदा) अंतर्गत एकूण २१ गुन्हे दाखल करून ४० तरुणींची सुटका केली. त्यात २ अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. या प्रकरणात एकूण २९ जणांना अटक करण्यात आली होती. त्यात १३ महिला आणि १६ पुरुषांचा समावेश आहे. त्यात दलाल तसेच बळजबरीने वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या आरोपींचा समावेश आहे. विरार पश्चिमेला बोळींज येथे म्हाडाची वसाहत आहे. यातील डी-७ इमारतीच्या सदनिका क्रमांक २१०४ मध्ये आंतरराष्ट्रीय देह व्यापार सुरू होता. अनैतिक मानवी वाहतूक शाखेच्या पथकाने छापा घालून या फ्लॅटमधून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीची सुटका केली. अन्य दोन मुलींना नालासोपारा येथील प्रगतीनगरमधून अटक करण्यात आली. या आंतरराष्ट्रीय सेक्स रॅकेट टोळीचा सुत्रधार आरोपी अशोक दास असून तो बांग्लादेशी आहे. आपल्या साथीदारांच्या मदतीने तो बांग्लादेशातून बेकायदेशीरपणे अल्पवयीन मुली आणि तरुणींना फसववून देहव्यापारासाठी मुंबईत आणत होता. बांग्लादेशातून मुली आणल्यानंतर या फ्लॅटमध्ये ठेवायचा. त्यानंतर या मुलींना मुंबईच्या ग्रँट रोड येथील रेड लाईट एरियामध्ये देहव्यापारासाठी पाठवत होता. त्याच्या अन्य साथीदारांचा शोध सुरू आहे. मागील दोन वर्षांत त्याने ३०० हून अधिक बांग्लादेशी मुलींना फसवून मुंबईत देहव्यापारासाठी आणल्याचे तपासात निष्पन्न झाले होते.

## खोलीत डांबलेलं, दररोज मारहाण अन् अत्याचार

### साताऱ्यातून मुक्त केलेल्या मजुरांनी सांगितली आपबीती



या सर्व पीडित वेठबिगारी मजुरांच्या स्थलांतरकाळात त्यांचे रेशनचे धान्य उचलल्याचे पंडित यांनी निदर्शनास आणून दिले असता, पुरवठा विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. स्थलांतरित विद्यार्थ्यांच्या नोंदी तसेच शिक्षण हमी कार्डबाबत समर्पक उत्तर न मिळाल्याने पुरवठा आणि शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना संबंधित कागदपत्र घेऊन येण्याचे निर्देश पंडित यांनी दिले. ज्या मुलांचे शिक्षण सुटले आहे, त्यांना तात्काळ जवळच्या आश्रमशाळेत दाखल करण्याच्या सूचना प्रकल्प अधिकारी नेहा भोसले यांना दिल्या.

**■जव्हार। प्रतिनिधी,**

सातारा येथून मुक्त केलेल्या जव्हार-मोखाडा येथील कातकरी या आदिम जमातीच्या वेठबिगार मजुरांची श्रमजीवी संघटनेचे संस्थापक आणि राज्याच्या आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी गुरुवारी भेट घेतली. उसतोडणीसाठी नेलेल्या या मजुरांना डांबून मारहाण केली जात होती, दररोज हा अत्याचार होत होता. अखेर या मजुरांनी मोबाइलवर व्हिडीओ रेकॉर्ड करून अन्यायाला फोडली होती. त्यानंतर श्रमजीवीच्या कार्यकर्त्यांनी थेट साताऱ्यातील कोरेगाव येथे जाऊन या मजुरांची सुटका केली. या मजुरांनी कथन केलेली छळाची कहाणी ऐकून उपस्थितांच्या अंगावर काटा आला.

एका खोलीत कोंडून अमानुष मारहाण

जव्हारमधील गणेश नगर आणि मोखाडा येथील पळसवाडी कातकरी वाडी येथून या मजुरांना ऊसतोडणीसाठी सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात एकंबे गावात नेले होते. तिथे मालकाकडून दररोज मारहाण, अत्याचार सुरू होते. याला कंटाळून काही मजुरांनी तेथून पळ काढला होता. त्यावेळी कृष्णा नडगे याला दोन मालकांनी पाच दिवस साखर कारखान्यातील एका खोलीत कोंडून अमानुष मारहाण केली होती. हे सांगताना कृष्णा आणि त्याच्या पत्नीला अश्रू अनावर झाले. १२ वेठबिगार मजूर आणि त्यांची १४ मुले यांची श्रमजीवीच्या कार्यकर्त्यांनी ९ जानेवारी रोजी मुक्तता केली.

श्रमजीवी संघटनेच्या सीता घटाळ, संतोष धिंडा, अंकुश वड, अजित गायकवाड, ईश्वर भांबरे आणि रवी वाघ या पदाधिकाऱ्यांनी सातारा येथे जाऊन या मजुरांची सुटका केली. त्यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी आणि पोलिस अधीक्षक समीर शेख यांचेही सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

## मोक्का गुन्हा लावलेल्या टोळी सदस्यांना अटक करण्यास पालघर पोलिसांना यश



**■पालघर। प्रतिनिधी,**

चोरी, घरफोडी, दरोडा व इतर गुन्ह्यांमध्ये सहभाग असणाऱ्या तसेच २०१७ मध्ये मोक्का गुन्ह्यामध्ये समाविष्ट झालेल्या मुंबईतील एका सराईत गुन्हेगाराच्या टोळीला पालघर पोलिसांना पकडण्यात यश आले आहे. गुन्हा करताना तांत्रिक तपासाचा आधार मिळू नये म्हणून दक्षता घेणारी तसेच चोरी केल्यानंतर वाहनाचा नंबर प्लेट बदलणारी ही टोळी बोईसर परिसरात जेरबंद केली असून या टोळीच्या चार सदस्यांपैकी तिघांना अटक करण्यात पालघर पोलिसांना यश आले आहे

२ जानेवारी रोजी बोईसर येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक गणपत सुळे व त्यांचे सहकारी पेट्रोलिंग करत असताना एका वाहनाची नंबर प्लेट काढताना काही इसम दिसून आले. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर संशय बळावल्याने वाहनाची झाडझडची घेतली असता वाहनामध्ये बनावट नंबर प्लेट व नंबर प्लेट तयार करण्यासाठी लागणारी रेडियम ची अक्षरे, क्रमांक व इतर सामुग्री त्याचबरोबर चोरी करण्याच्या दृष्टीने वॉकी टॉकी, स्क्रू ड्रायव्हर, लोखंडी कटावणी, चाकू, कटर इत्यादी साहित्य सापडले. अंजन महंती (५१) टागोर नगर विक्रोळी, श्रावण हेगडे (४५) गोवंडी व सरोज अन्सारी (२६) गोवंडी या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन बोईसर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात तपास केल्यानंतर तारापूर, बोईसर यांच्यासह मुंबई, पुणे परिसरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या ४४ गुन्ह्यांमध्ये यापैकी एका गुन्हेगाराचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच जुईनगर नवी मुंबई येथे बँक ऑफ बरोडा येथे लगतच्या गळ्यामधून भुयारी मार्ग करून बँक ऑफ बरोडा येथे केलेल्या साडेतीन कोटीच्या चोरी मध्ये यापैकी काहींचा समावेश आहे. सहा गुन्ह्या मध्ये या आरोपांनी आपल्या सहभाग कबूल केला असून या चोऱ्यामधील मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

सन २०१७ मध्ये या टोळी विरुद्ध मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. दरम्यान तुरुंगात असताना त्यांनी आधुनिक तंत्रज्ञाना विषयी अधिक माहिती घेऊन चोरी करण्यासाठी वॉकी टॉकीचा वापर करत असल्याचे उघडकीस आले आहे. बोईसर च्या स्थानिक गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे मोठी घटना घडण्यापासून बचावल्याचे पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी पत्रकारांना सांगितले. चोरी करण्यापूर्वी मोबाईल व इतर तांत्रिक तपासात वापरण्यात येणारे धागेद्वारे उपलब्ध नसताना स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलिस निरीक्षक अनिल विभूते व त्यांच्या सहकाऱ्यांनी या गुन्ह्यातील आरोपी संदभार्तील पुढील तपास करण्यास महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे पोलीस अधीक्षक यांनी सांगितले.

## राष्ट्रीय महामार्गावरील मेंढवन खिंडीजवळ कार अपघात

### दोनजण जखमी



**■कासा। प्रतिनिधी,**

आज संध्याकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास मुंबईकडून गुजरातला जात असलेल्या वाहिनीवर होंडा कंपनीच्या कारचा अपघात होऊन या अपघातामध्ये कारमधील दोनजण किरकोळ जखमी झाले आहेत. आज संध्याकाळी गुजरात कडे निघालेल्या होंडा जाझ कार चालकाला मेंढवन खिंडीसमोरील तीव्र वळण आणि उताराचा अंदाज न आल्यामुळे गाडीवरील नियंत्रण सुटून गाडी दुभाजकाला आदळून महामार्गावर उलटली. या अपघातामध्ये गाडीचा चुराडा झाला तसेच कारमधून प्रवास करणारे दोघे जखमी झाले. मेंढवन खिंडीमध्ये तीव्र वळण आणि उतार असल्यामुळे या ठिकाणी नेहमीच अपघात होत आहेत.आज संध्याकाळी या ठिकाणी अपघात झाल्यानंतर काही वेळातच महामार्ग पोलीस महामार्गाचे काम पाहणाऱ्या कंपनीचे कर्मचारी हजर झाले. अपघातग्रस्त कारमधून दोन्ही जखमींना बाहेर काढून कासा येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले. जखमी झालेल्या दोघांची ही प्रकृती स्थिर आहे. कार उलटल्यानंतर पाठीमागे दुसरे वाहन नसल्यामुळे सुदैवाने या अपघातात कुठलीही जीवित हानी झाली नाही. अपघात झाल्यानंतर अर्धा तास महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. महामार्ग पोलिसांनी अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या साह्याने महामार्गावरून बाजूला केले त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. मेंढवन खिंडीमध्ये अपघात होऊ नये म्हणून सूचना फलक, रस्त्यावर रंबलर बसवले आहेत. तरीसुद्धा वाहन चालक वेगाने वाहने चालवून या ठिकाणी अपघात होत आहेत.

